डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

अर्थ प्रशासन विभाग

महत्वाचे

परिपत्रक

जा.क्र.अप्रवि/अंदाज/ख.प्र/२०२६-२७/ 1803 दिनांक: १९ आक्टोंबर, २०२६

या कार्यालयायचे असे निदर्शनारा आले आहे की, आपल्या कार्यालय/ विभागाकडून वरिष्ठ कार्यालयास खरेदी अथवा इतर प्रस्ताव अपूर्ण, अस्पष्ट व तपशिलवार सादर करण्यात येत नाहीत त्यामुळे नाइलाजास्तव तृटी पुर्ततेस्तव नस्त्या परत कराव्या लागतात पर्यायाने वेळेचा अपव्यय होतो त्यागुळे सर्व कार्यालय प्रमुख तसेच सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, या कार्यालयास खरेदी प्रस्ताव सादर करतांना पुढील बाबींचे काटेकोर पालन करण्यात यावे.

१. GeM Portal द्वारे खरेदी प्रक्रिया राबविण्यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे व त्याबाबतचे दस्तऐवज नस्तीसोबत जोडण्यात यावेत.
२. महाराष्ट्र शासन उद्योग , उर्जा व कामगार विभागाचे शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ व ०७/०५/२०२१ अन्वये विहीत खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.
३. विभागाने खरेदी प्रक्रियेबाबत दरपत्रके/ निविदा मागणीची सुचना पत्रके विद्यापीठ संकेत स्थळावर व्यापक प्रसिध्दी दिल्याबाबतचे दस्तऐवज नस्ती सोबत जोडण्यात यावे.
४. विहीत मार्गाने प्रस्ताव नियंत्रण अधिकारी मार्फत सादर करण्यात यावेत.नियंत्रण अधिकारी यांच्या स्तरावर नस्त्यांची सखोल पडताळणी करुनच नस्ती मंजुरीस्तव प्रस्तावीत करावी.
५. प्रस्तावामध्ये निधीस्त्रोत बाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.
६. नस्तीसोबत मासिक खर्च व मासिक उत्पन्नाबाबतचे विवरणपत्र वेतन व लेखाधिकारी यांनी प्रमाणित केलेले असावे.
७. निधी उपलब्धतेनुसारच प्रस्ताव सादर करण्यात यावेत.
८. कार्योत्तर प्रस्ताव सादर करण्यात येऊ नयेत असे प्रस्ताव कोणत्याही परिस्थिती मंजुर करण्यात येणार नाहीत याची विभागाने दक्षता घ्यावी.
९. शक्यतो विभागाने विद्यापीठ निधीतून अनुदान मागणीचे प्रस्ताव सादर करण्यात येऊ नये कारण विद्यापीठ निधीतून फार अत्यावश्यक व अटळबाबीवरील खर्च भागविला जातो.

१९/१०/२६

नियंत्रक
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

प्रत:-

१. मा.कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या माहितीस्तव.
२. मा.नियंत्रण अधिकारी (सर्व), डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या माहितीस्तव.
३. विभाग प्रमुख (सर्व)/ कार्यालयीन प्रमुख (सर्व)/ आहरण व संवितरण अधिकारी (सर्व) यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव.
४. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसारणाकरीता
५.मा.कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना मा.कुलगुरु महोदय यांच्या माहिती करीता सादर.